# नवनिर्मित : कर्ज सुरक्षा निधि नियमावली

1) या नियमास दि हायकोर्ट एम्प्लॉईज को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,मुंबई, कर्जसुरक्षा निधिचे नियम असे संबोधावे.

2) अ) ज्या दिवशी उपनिबंधक महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था, मुंबई हे या नियमास मंजूरी दिल्याचे दि हायकोर्ट एम्प्लॉईज को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,मुंबई,या संस्थेस कळवतील त्यानंतर कार्यकारी मंडळ जी तारीख नक्की करेल त्या दिवसापासुन यातील नियम अंमलात येतील.

ब) दि हायकोर्ट एम्प्लॉईज को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड,मुंबई, असा प्रत्येक वेळी उल्लेख न करता सोयीच्या दृष्टीने "संस्था" असा यापूढे उल्लेख केला जाईल.

क) हे कर्ज सुरक्षा निधीचे नियम कर्ज रक्कम रू.1,00,000/– व त्यापुढील कर्ज रक्कमेकरीता सर्व कर्जदारास बंधनकारक राहिल.

ड) संस्थेच्या सभासदास ज्या तारखेस कर्जसुरक्षा निधि पोटी रक्कम कपात करून त्याला कर्ज देण्यात येईल त्या तारखेपासून 6 महिन्यानंतर तो या कर्जसुरक्षा निधि योजनेचा लाभार्थी असेल परंतू अपघाती मृत्यू झालेला सभासद या योजनेचा लाभार्थी असेल.

ई) आत्महत्या (Suicide) केलेल्या सभासदास या योजनेचे कोणतेही लाभ मिळणार नाहीत.

फ) सदर निधिच्या व्यवस्थापनासाठी संस्थेच्या कार्यवाहांच्या अध्यक्षतेखाली एकूण पाच संचालकांची कर्जसुरक्षानिधि समितीवर नेमणूक करेल व या समितीचा कालावधी संचालक मंडळा प्रमाणे राहील.

3) <u>निधिचा उद्देश</u>

1) सभासदांकडून कर्जसुरक्षा निधी पोटी रक्कम कपात केल्याच्या तारखेपासून 6 महिन्यांनंतर कर्ज शिल्लक असताना सभासदाचा नैसर्गिक किंवा अपघाती मृत्यु झाला तर त्याचे शिल्लक राहीलेले संपूर्ण कर्ज या कर्ज सुरक्षा निधिमधुन वळते करण्यात येईल परंतू अपघाती मृत्यू झालेल्या सभासदाचे शिल्लक राहीलेले संपूर्ण कर्ज या कर्जसुरक्षा निधी मधून वळते करण्यात येईल.

4) <u>कर्जसुरक्षा निधिची उभारणी किंवा निर्मिती.</u>

अ) दिर्घ मुदत कर्ज, विशेष कर्ज किंवा अल्पमुदत कर्ज घेताना सर्व कर्जदार सभासदांकडून प्रत्येक वेळी (कर्ज नूतनीकरण करत असतील तरीही) मंजूर कर्ज रक्कमेच्या 2% एवढी रक्कम कर्जसुरक्षा निधि पोटी कर्जातून कपात करण्यात येईल.

ब) यापूर्वी ज्या सभासदांनी साधे कर्ज, विशेष कर्ज किंवा अल्पमुदत कर्ज घेतले असेल व त्यांना या कर्जसुरक्षा निधी नियमावलीचा लाभ घेण्याची इच्छा असेल अशा सभासदांनी कर्जसुरक्षा निधी योजना लागु झाल्यापासून 1 वर्षाच्या आत तसे पत्र संस्थेत दिल्यास त्यांनी दिलेल्या पत्राच्या तारखेपर्यंत त्यांचे जेवढे कर्ज शिल्लक असेल तेवढया कर्जाच्या 2% एवढी रक्कम धनादेशाद्वारे किंवा रोखीने संस्थेच्या कर्जसुरक्षा निधी पोटी जमा करावी. कर्जदार ज्या तारखेस ही रक्कम जमा करतील त्या तारखेपासून 6 महिन्यांनंतर असे कर्जदार या कर्ज सुरक्षा निधी योजनेचे लाभार्थी होतील परंतू अपघाती मृत्यू झालेले कर्जदार सभासद या कर्जसुरक्षा निधी योजनेचे लाभार्थी होतील.

क) आपल्या संस्थेच्या नफ्याची वाटणी करताना गरज भासल्यास कर्जसुरक्षा निधि पोटी तरतूद करण्यात येईल.

ड) मयत कर्जदार सभासद पोटनियमातील नियम क्र. ड–1.8(6) अन्वये उल्लंघनात्मक थकबाकीदार नसावा.

5) **गुंतवणुक :** महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा व त्यातील नियमाप्रमाणे कर्ज सुरक्षा निधिची गुंतवणूक करण्यात येईल.

6) विनियोग : कर्जसुरक्षा निधिचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यात येईल

1) एखाद्या कर्जदार सभासदाचा कर्ज सुरक्षा निधिपोटी रक्कम कापून घेतल्यापासून 6 महिन्यानंतर जर नैसर्गिक किंवा अपघाती मृत्यु झाला तर त्याचे शिल्लक राहीलेले संपूर्ण कर्ज (साधे कर्ज/विशेष कर्ज/अल्पमुदत कर्ज) या कर्जसुरक्षा निधिमधुन वळते करण्यात येईल परंतू अपघाती मृत्यू झालेल्या सभासदाचे शिल्लक राहीलेले संपूर्ण कर्ज या कर्जसुरक्षा निधी मधून वळते करण्यात येईल.

अ) मयत सभासदाच्या वारसाचा अर्ज एका सभासदाच्या शिफारशीसह सभासद मयत झाल्यापासून 30 दिवसांचे आत संस्थेत दाखल करणे बंधनकारक आहे.

ब) मयत सभासदाच्या वारसदाराने त्या सभासदाच्या मृत्युचे प्रमाणपत्र संस्थेस दिले पाहिजे

2) सभासदाचा या कर्जसुरक्षा निधिपोटी रक्कम कापून घेतल्यानंतर ते त्याच्या (साधे मुदत/विशेष/अल्पमुदत) कर्जाची मुदत संपण्यापर्यंत मृत्यु झाला नाही तर त्याची ही कापून घेतलेली रक्कम त्यास कोणत्याही कारणास्तव परत मिळणार नाही.

3) फक्त नैसर्गिक आपत्तीच्या वेळी जर एकाच वेळी जास्त वारसदारांचे अर्ज आले तर त्यांना कशा प्रकारे व किती मदत त्यांच्या कर्ज खात्यात वळते करावी या बाबत संचालक मंडळाच्या सभेत निर्णय घेण्यात येईल व तो सर्वांना बंधनकारक असेल.

4) या निधिसाठी जर काही रक्कम कमी पडत असेल तर संचालक मंडळाला जास्तीची रक्कम आकस्मिक निधि मधुन खर्च करण्याचा अधिकार राहील.

5) या नियमांमध्ये कोणत्याही प्रकारचे बदल करण्याचा अधिकार संस्थेच्या सर्वसाधारण सभेकडे राहील.